**प्रेसनोट** दिनांक ०६/१०/२०२१

**लाच स्विकारले प्रकरणी सहायक.पोलीस उपनिरीक्षक यांचेवर कारवाई**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सातारा युनिट |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | वाई पोलीस स्टेशन गु.र.क्र.२४० /२०२१ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ |
| **आरोपींचे नाव व कार्यालय** | रमेश झिपा कोळी, वय ५७ वर्षे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, वाई पोलीस स्टेशन सध्या रा- स्वप्नशिल अपार्टमेंट,सहयाद्री नगर, कृष्णा हौसींग सोसायटी, यशवंतनगर ग्रामपंचायत, वाई ता.वाई जि.सातारा मुळ रा.अमळथे ता.सिंधखेड जि.धुळे, वर्ग ३. |
| **घटनास्थळ** | राजशाही हॉटेल, वाई पोलीस स्टेशन जवळ , वाई ता.वाई जि.सातारा |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ४०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती २०००/- रुपये मागितले. (दोन हजार पाचशे रुपये) |
| **लाच स्विकारली रक्कम** | २०००/- रुपये (दोन हजार पाचशे रुपये) |
| **थोडक्यात माहीती** | पडताळणी व सापळा दिनांक :-०५/१०/२०२१<br>तक्रारदार यांनी दि. ०५/१०/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०५/१०/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी व सापळा पंचनामा कारवाई दरम्यान घडलेल्या घटना, ध्वनीमुद्रीत संभाषण यावरुन, वाई पोलीस स्टेशनचे पोलीस नामे रमेश झिपा कोळी, सहायक पोलीस उपनिरीक्षक, यांनी तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयामध्ये तपासकामी व प्रतिबंधक कारवाईत मदत करण्यासाठी रु.४,०००/- मागणी केल्याचे मान्य करुन तडजोडीअंती रु.२,०००/- तक्रारदार यांच्याकडे २,०००/- रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम दि. ०५/१०/२०२१ रोजी १८.४० वाजता वाई पोलीस स्टेशन, जि. सातारा शेजारील राजशाही हॉटेलमध्ये स्विकारुन वैध परिश्रममिकाहून अन्य परितोषण म्हणून आर्थिक फायदा मिळविला म्हणून त्यांचेविरुध्द तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे. |
| **सापळा पथक** | सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक तसेच मा.सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री.अशोक शिर्के, पोलीस निरीक्षक विशाल गिरी, सहा.पोलीस उपनिरीक्षक आनंदराव सपकाळ, काटवटे, पो.हवा.भरत शिंदे, पो.ना विनोद राजे, प्रशांत ताटे, विशाल खरात, मपोना श्रद्धा माने, पो.कॉ.संभाजी काटकर, तुषार भोसले, निलेश येवले, व म.पो.कॉ.शितल सपकाळ सर्व नेमणुक ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधीत काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता:- सि.स.नं ५२४/अ, जिल्हा कोषागार कार्यालयाजवळ, सदरबझार सातारा

संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in

ईमेलः- dyspacbsatara@gmail.com

ऑनलाईनतक्रार ॲप :-www.acbmaharashtra.net

टोल फ्रीक्रमांक :- १०६४

दुरध्वनीक्रमांकः- ०२१६२-२३८१३९

मा सादर

(अशोक शिर्के)

पोलीस उपअधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा.